महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कार्यरत समुदाय संसाधन व्यक्तींना **“ग्रामसखी”** म्हणून संबोधन्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

## शासन निर्णय क्रमांकः बैठक-२०२५/प्र.क्र.९२/ योजना -३

बांधकाम भवन, फ़ोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक : १३ डिसेंबर, २०२५

**प्रस्तावना :-**

सन २०११ मध्ये राज्यातील ग्रामीण भागातील गरीबी निर्मुलनासाठी केंद्र शासनामार्फ़त दिनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (DAY-NRLM) राबविण्यात येत असून, यासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची (Maharashtra State Rural Livelihood Mission) अर्थात उमेदची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरीबी निर्मूलनाचे प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यात ग्रामीण भागातील गरीब व जोखीमप्रवण महिलांना समृध्द, आत्मसन्मानाचे व सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठी त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्वावर आधारीत स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे.

सदरहू अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरापासून ते क्लस्टरस्तरापर्यंत स्वतंत्र, समर्पित व संवेदनशील यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे. अभियानांतर्गत गरीब महिलांचे स्वयं सहाय्यता गट व स्वयं सहाय्यता गटाचे ग्रामसंघ व ग्रामसंघाचे प्रभागसंघ तयार करुन गरीब महिलांचे संघटन तयार करण्यात येते. तसेच, या माध्यमातून गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीविका उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडून प्रयत्न करण्यात येतात. गावपातळीवर सुलभिकरणासाठी वेगवेगळ्या संवर्गातील “समुदाय संसाधन व्यक्ती” कार्यरत असून, त्यांना “ग्रामसखी” या पदनामाने संबोधण्याची अथवा असे पदनाम देण्याची उमेद कर्मचारी संघटनेची मागणी शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाच्या मागदर्शक सूचनान्वये “महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान” अंतर्गत गरीब महिलांना गरीबीतून बाहेर पडण्यासाठी, सुलभिकरण करण्यासाठी प्रेरिका, बँक सखी, आर्थिक साक्षरता सखी (FLCRP), पशु सखी, कृषी सखी, मत्स्य सखी, वन सखी, मास्टर CRP (कृषी), कृषी उद्योग सखी, बीडीएसपी व कृतिसंगम सखी (CTC) अशा स्वरुपाच्या “समुदाय संसाधन व्यक्ती” समुदायस्तरीय संस्थामार्फ़त कार्यरत आहेत. सदर समुदाय संसाधन व्यक्ती ह्या गावपातळीवर अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासंदर्भात विविध विषयासाठी मार्गदर्शन व सुलभिकरणाचे काम करतात. सदरील “समुदाय संसाधन व्यक्ती” ह्या ग्रामीण भागामध्ये कार्यरत असल्यामुळे त्यांना यापुढे

त्यांच्या पदनामाच्या समोर “ग्रामसखी” असे पदनाम लावण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार या अनुषांगिक पदांच्या पदनामामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे:-

| **अ.क्र.** | **समुदाय संसाधन व्यक्तीचे सध्याचे पदनाम** | **सुधारीत पदनाम** |
|---|---|---|
| १ | ICRP (प्रेरिका) | ग्रामसखी - प्रेरिका |
| २ | बँक सखी | ग्रामसखी - बँक लिंकेज |
| ३ | आर्थिक साक्षरता सखी (FLCRP) | ग्रामसखी - आर्थिक साक्षरता (FLCRP) |
| ४ | पशु सखी | ग्रामसखी - पशुसवर्धन |
| ५ | कृषी सखी | ग्रामसखी - कृषी विकास |
| ६ | मत्स्य सखी | ग्रामसखी - मत्स्य पालन |
| ७ | वन सखी | ग्रामसखी - वनउपज |
| ८ | मास्टर CRP (कृषी) | ग्रामसखी - मास्टर CRP (कृषी) |
| ९ | कृषी उद्योग सखी | ग्रामसखी - कृषी उद्योग |
| १० | BDSP | ग्रामसखी - BDSP |
| ११ | कृतिसंगम सखी (CTC) | ग्रामसखी - कृतिसंगम (CTC) |

२. पदनामातील सदर बदल विचारात घेवून वरीलप्रमाणे कार्यरत समुदाय संसाधन व्यक्तींना उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत ओळखपत्र देण्यात यावे.

३. सदर निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१२१३१६३३४९५०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIVEK ASHOK DAINGADE

Digitally signed by VIVEK ASHOK DAINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=53c2fccec74ddb1c052589e5cbaed9d19ba0d0043df169c83be27faeb8bf045b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=670EB0FA576F65F4406D031E11A90EA6FFB3AEFB253D401F5CED2AD1A6605DBF, cn=VIVEK ASHOK DAINGADE
Date: 2025.12.13 18:35:01 +05'30'

**(विवेक दाईंगडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव व प्रधान सचिव. मंत्रालय, मुंबई.

३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.

४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा. मंत्री (ग्रामविकास व पंचायतराज) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. मा. राज्यमंत्री (ग्रामविकास व पंचायतराज) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

७. प्रधान सचिव (ग्रामविकास व पंचायतराज) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

८. महालेखापल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई-१/नागपूर-२.

९. महालेखापल (लेखा परीक्षा), मुंबई-१/नागपूर-२.

१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

११. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर, नवी मुंबई.

१२. सहसचिव (योजना), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.

१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).

१४. अपर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व).

१५. सर्व प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर,नवी मुंबई.

१६. निवड नस्ती ,(३-योजना) ग्राम विकास विभाग.मुंबई ,बांधकाम भवन ,